The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत साहित्यातील प्रबोधन

**प्रा. शशिकांत वि. काळे**
मराठी विभाग, कला, वाणिज्य महाविद्यालय, जरूड, ता. वरूड जि अमरावती

महाराष्ट्र भूमी हा संतांची भूमी म्हणून ओळखल्या जाते. या भूमीची संत परंपरा देव देव करणारी नाही तर सामान्य जनांच्या जीवनाचा विचार करणारी आहे. त्याच्या सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक व धार्मिक समस्यांची उत्तरे या संत साहित्याने दिलेली आहे. संत साहित्याचा मुख्य हेतू भक्ती जरी दिसत असला तरी सामान्य जनांच्या अधोगतीचे कारणे त्यांच्या समोर होती. त्या कारणांच्या निर्मलूनाकरिता आपल्या वाड्.मयातून त्यांनी उपाययोजना सूचविलेली दिसते. सामान्य जनांना त्यांच्याच जीवनातील बाबींद्वारे, त्यांच्या वाणीतून समजावून सांगितले तरच ते प्रभावी ठरते याची जाणीव संतांना होती म्हणूल लोकभाषा व लोकजीवन आणि अध्यात्म यांचा प्रभावी समन्वय संतांनी केलेला दिसतो. त्यांचे साहित्य माणसाला स्व ची ओळख करून देण्यास समर्थ आहे. त्याच्या जीवनाला साहित्यात संतांनी आणले व लोकशिक्षण दिले. मनोरंजनातून शिक्षण हे प्रभावी माध्यम संतांनी स्वीकारलेले दिसते. त्याचबरोबर लोकजीवनातील रूढी, विधी, प्रथा, परंपरा यांचा वापर प्रबोधनासाठी संतांनी केलेला दिसतो. मानवी अंतरंगात शिरून मानवी जीवनाला वळण लावण्याचे मार्ग या साहित्यात आहे.

संत ज्ञानेश्वर यांनी संस्कृतातील रचना तत्कालीन मराठीत आणून ज्ञानभाषा ही मातृभाषा असली तर शिक्षण कसे प्रभावी होते. हे ज्ञानेवरीद्वारे सिद्ध केलेले आहे. सामान्य माणसांच्या धार्मिक ज्ञानासाठी न कळणारी भाषा दूर सारत त्यांनी लोकभाषा वापर केला. त्यातून सामान्य जनांचे प्रबोधन केले. वारकरी संप्रदायात महत्वपूर्ण असलेले संत ज्ञानेश्वर हे लोकजीवनाला, लोकमानसाला वळण लावणारे आहेत. त्यांचे पसायदान विश्वकल्याणाची भूमिका विशद करणारे अजरामर वाड्.मय आहे. अमृतानुभव चांगदेव पासष्ठी अशा विविध ग्रंथातून त्यांनी लोकमानसाचे प्रबोधन केलेले दिसते. संस्कृताच्या जोखडातून त्यांनी मुक्तता करत लोकभाषेला वाव दिला. ज्या वर्गाला ज्ञानी करायचे आहे त्याच वर्गाच्या भाषेतून प्रबोधन करण्याचे कार्य उत्तम होते याची जाणीव संत ज्ञानेश्वरांना होती. आता शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावी असा आग्रह होत आहे. परंतु हा विचार आणि तशी कृती संत ज्ञानेश्वरनी त्या काळातच केलेली दिसते. याच काळात महानुभाव पंथ उदयास आला. श्री च्रक्रधर स्वामी यांच्या शिष्यपरंपरेने निर्माण केलेले साहित्य आणि त्यातील प्रबोधन हे जनमानसात रूजलेले दिसते. स्त्रीला मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य या पंथाने केलेले दिसते. जातीप्रथा मोडण्याचे

महत्त्वपूर्ण कार्य या पंथाने केले. हे सर्व कार्य व तशी विचारधारा त्यांच्या ग्रंथातून समोर येते. 'संस्कृतात ग्रंथरचना करावी, हा शिष्टमान्य संकेत रूढ असण्याच्या या काळात चक्रधर व नागदेवाचार्य यांनी आपल्या ग्रंथकारांना कटाक्षाने मराठीतच ग्रंथरचना करण्यास सांगितले. आपल्या स्वामीचा सामान्यु परिवारू नागविला जाऊ नये, काठिन्यता चुकवून त्याला परमेश्वर लाभाला वाव असावा म्हणून महाराष्ट्रीये निरूपिले की गा असे त्यांनी स्पष्ट सांगितले.'[1] महानुभाव पंथातील ग्रंथ हे लोकभाषेत असून लोकजीवनाला पुरक अशा दृष्टांतांनी परिपूर्ण आहे. महानुभाव पंथ हा समानतेवर आधारित असून त्याचा प्रसार या ग्रंथानी केला. जनमानसात असलेल्या जातिपातीच्या कल्पना, स्त्री पुरूष भेद यावर असलेले पंथीय विचार समाजपूरक आहेत. या संत मांदियाळीने आपल्या ग्रंथाआधारे समाज जागृती केली असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. लीळाचरित्र, श्री गोविंदप्रभू चरित्र, दृष्टांतपाठ,सूत्रपाठ अशा

विविध ग्रंथातून महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान विशद करता करता लोकजीवनाचा अभ्यास व लोकमानसास मार्गदर्शन असे या ग्रंथांचे स्वरूप दिसते.

संत नामदेवांनी उत्तर भारतापर्यंत मराठीचा प्रसार केलेला दिसतो. भक्तीमार्गाची ओळख करून देताना त्यांनी जीवन आणि परमार्थ यांची सांगड घातलेली दिसते. कुटुंबात राहून परमार्थ साधता येतो. कौटुंबिक जबाबदारीची जाणीव त्यांनी करून दिलेली दिसते. त्यांची अभंगवाणी सर्वसामान्य रूचेल, पचेल अशा स्वरूपात निर्माण झाली. देव भावाचा भुकेला । याति कळेनाही त्याला अशा विचारातून जातिप्रथेला विरोध करून त्याविरोधात आपले मत मांडणारे संत नामदेव खरे प्रबोधनकार होत. त्यया काळातील प्रतिगामी विचारांच्या, प्रथेच्या विरोधात आपली लेखणी चालविणारे नामदेव समाजाचे पथदर्शी आहेत.

संत बसवेश्वरांनी लोकमानसात असलेल्या देव संकल्पनातील फोलपणा दाखवून योग्य मार्गाचा परिचय सामान्य जनांना करून दिला. बसवेश्वरांचे विचार हे समतेचे आहेत. समानता व मानवाची अंतर्बाह्य शुद्धता याचवर त्यांनी भर दिलेला आहे.

दगडाचा देव, देव नव्हे
मातीचा देव, देव नव्हे
वृक्ष देव, देव नव्हे
धातूचा देव, देव नव्हे
सेतूबंध रामेश्वर
काशी गोकर्ण केदार

अन् इतर क्षेत्रीचा

देव, देव नव्हे

देव तुमच्या अंतर्यामी

आत्मदेव जाणणेचि थोर

कुंडलसंगमदेव तोचि एक परमेश्वर[2]

संत बसवेश्वर यांनी मांडलेले विचार किंवा प्रबोधन हे सामान्य जनांना वास्तवाची ओळख करून देणारे आहेत. त्यांचे विचार हे तर्कनिष्ठ आहेत. त्यांनी दिलेले उदाहरण हे वास्तववार आधारित असून मानवी जीवनाच्या अधोगतरचे खरे कारण शोधून त्यांनी त्यावरील उपाययोजना सूचविलेल्या दिसतात.

संत एकनाथ हे लोकशिक्षक होते. त्यांचे लेखन हे सामान्य जनांच्या सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक उत्थानकरिता उपयुक्त आहे. लोकमानस ओळखून त्यांनी आपले लेखन केले. त्या काळात धार्मिक क्षेत्रात अनागोंदी होती. सामान्य जनता अज्ञानात खितपत होती. संस्कृतातील ग्रंथ सामान्य जनांच्या आवाक्यापलिकडील होते. अशा काळात लोकजीवन व अध्यात्म यांचा संबंध जोडत, लोकभाषेशी जवळिक करून त्यांनी आपल्या रचना निर्माण केल्या. संस्कृत भाषा देवाने निर्माण केली तर प्राकृत काय चोरापासून निर्माण झाली काय? असा रोखठोक सवाल करणारे संत एकनाथ यांनी मातृभाषेचे महत्त्व त्या काळात विशद केले आहे. त्यांनी प्रपंच व परमार्थ यांचा समन्वय साधलेला दिसतो.

गृहाश्रमू न सांडितां। कर्मरेखा नोलांडितां।

निजव्यापारी वर्तता। बोधू सर्वथा न मैळे।।[3]

परमार्थ व प्रपंच यांची सांगड घालून त्यांचे अध्यात्म निरूपन सामान्य जनांना कुटुंब जबाबदारी पूर्ण करत अध्यात्म साधण्याचा मार्ग दाखविणारे आहे. त्यांचे भारूड हे लोकप्रबोधनासाठी लोककलेचा वापर करून निर्माण झाले आहे. मनोरंजानातून लोकशिक्षण करण्याचा हा यशस्वी मार्ग नाथांनी निर्माण केला. संतांनी प्रबोधनासाठी लोकमनाचा सूक्ष्म विचार करून प्रबोधनाचे माध्यम निर्माण केलेले दिसते. संत गोरा कुंभार, संत सावता माळी, नरहरी सोनार, चोखामेळा,कर्ममेळा, सेना महाराज,जनाबाई, मुक्ताबाई या संत मांदियाळीने स्पृश्य अस्पृश्य भेदाभेदवर प्रकाश टाकला. आपल्या अभंग रचनेने लोकमानसाची मने साफ केली.

संत रामदास यांच्या मनाचे श्लोक म्हणजे मानवी मनाला वळण लावणारे विचार होय. मानवी मन जर योग्य संस्काराने युक्त असले तरच ते योग्य विचार करेल आणि त्ययातूनच एक योग्य व्यक्तिमत्त्व घडते. असे संस्कारशील व्यक्तिमत्व घडविण्याच्या दृष्टीने संत रामदास यांनी मांडलेले विचार उपयुक्त आहेत.'सुसंगती सदा घडो कुसंगती ना घडो' असा विचार मांडून संगतीचे महत्त्व

मांडणारे विचार आजही उपयुक्त आहेत मानवी जीवन कसे असावे याचा आदर्श विचार यातून दिसून येतो.

मना वासना दुश्ट कामा नये रे। मना सर्वथा पाप बुद्धी नको रे ।।
मना सर्वथा निति सोडू नको हो। मना अंतरी सार विचार राहो।।[4]

संत रामदास यांनी आपल्या मनाचे श्लोकमधून मानवी जीवनाला पूरक ठरतील असे विचार मांडलेले आहे. मानवी मनाचा विचार त्यांनी केलेला आहे. मानवी जीवनाचा मानसशास्त्रीय दृष्टीतून त्यांनी केला असे म्हटल्याच चुकीचे होणार नाही. 'मानवी मन हे लोभाने ग्रासलेले आणि त्यामुहे सद्सद्विवेक बुद्धीचा नाष होणे अपरिहार्य आहे. सध्याच्या काळात अशा अपवृत्तीचा प्रभाव वाढताना दिसतो. अशा वृत्तीची संगत माणसाच्या विनाशास कारणीभूत ठरते. रामदासांनी अशा अपवृत्ती मानसिकतेचा शेवट पाप संचयात व दुःखात होतो हे सप्रमाण सिद्ध केले आहे.'[5] संत रामदास यांचे प्रबोधनातमक विचार आजही उपयुक्त आहे. मनाला काबूत ठेवले तर मानवी जीवन कल्याकारक होते. मनाला कसे वळण लावावे याचा उपदेश व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीकोनातून महत्त्वपूर्ण आहे.

संत तुकाराम म्हणजे लोकमानसाचा परिपूर्ण विचार करून अभंगातून प्रबोधन करणारे महान संत होय. त्यांच्या अभंगातून लोकजीवनाचे संदर्भ येत लोकजीवनातील चुका दर्शवून त्याला योग्य करण्याचे मार्ग

दर्शविणारे तुकारामांचे अभंग होय.
'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले
तोची साधू ओळखावा देव तेथेची जाणावा[6]

संत तुकारामांनी तत्कालीन समाजमनात भरलेल्या अंधश्रद्धा दूर करण्यासाठी आपल्या अभंगातून प्रबोधन केलेले दिसते. साधू, संत बनून सामान्य जनतेला फसविणारे भोदू साधू यांचे प्रस्थ त्याकाळात होते. सामान्य जनता अशा लोकांच्या पाशसात अडकत आपले होत नव्हते गमावत होते. अशा साधूविरोधात त्यांनी आवाज उठवत खरी भक्ती कशी असते याचे प्रबोधन केले. संत तुकाराम यांनी पर्यावरणाचे उपयुक्त विचार आपल्या अभंगातून मांडलेले आहेत. तुकारांचे विचार कालातीत आहेत. आजही तुकारांचे अभंग हे मानवाच्या कल्याणासाठी उपयुक्त आहेत.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणजे आधुनिक काळातील ग्रामीण विकासाचा परिपूर्ण विचार करणारे संत होय. ग्रामीण जीवनातील समस्या त्यांनी अनुभवल्या व त्यातून ग्राम मानस परिवर्तन करणे आवश्यक होते. शिक्षणाचे महत्त्व, जातीपाती विरहित समाजरचना, ग्रामीण विकास, ग्रामीण व्यक्तिमत्व, स्वच्छता, देशप्रेम असे विविध विषय त्यांच्या लेखनातून बाहेर आले.
दिखाऊ कपडे, कोरडी ऐट नोकरपेशी थाटमाट

हे शिक्षणाचे नव्हे उद्दीष्ट ध्यानी घ्यावे हे नीट आधी[7]

राष्ट्रसंतांनी अशा शब्दांत लोकमानसात निर्माण झालेले गैरविचार समोर आणून वास्तवाची जाणीव करून दिली. शिक्षण हे समाजशील व संस्कारशील माणूस घडविण्यासाठी असते परंतु शिक्षण व नोकरी याचा संबंध जोडून नोकरपेशातील माणूस आपले कर्तव्य विसरून आपल्या पदाच्या गर्वात मग्न झाला. त्याला त्याचे पद हे लोकसेवेसाठी असल्याची जाणीव राष्ट्रसंत करून देतात. त्यांनी ग्रामोन्नतीचा मार्ग दाखविला. स्त्री समतेचा पुरूस्कार त्यांनी केला. मानवधर्माची शिकवण देत राष्ट्रीय प्रेम त्यांनी उत्पन्न केले. समाजमनात असलेले बुरसटलेले विचार दूर करून देशाला पूरक असा तरूण निर्माण करणारे त्यांचे लेखन आहे.

याच आधुनिक काळात गाडगे बाबा निर्माण झाले. त्यांचे कीर्तन म्हणजे संवादयुक्त प्रश्नउत्तराने भारावलेले असायचे. बोलीतून श्रोत्यांना प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या जीवनातील चुका दर्शवून मार्गदर्शन करण्याची त्यांची शैली ही लोकसमुहाचे मानसशास्त्र ओळखणारी होती. प्रथा, परंपरेचा नावाखाली चाललेल्या अंधश्रद्धा याबर त्यांनी प्रहार केला. शिक्षणाचे महत्त्व त्यांनी आपल्या प्रबोधनातून विशद केले. कुटुंबाने आपल्या मुलांना शिकवावे याचा आग्रह त्यांचा होता. सर्व समस्यांचे मूळ हे अज्ञान आहे. व शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. याची जाणीव त्यांना होती. मानवी मनात असलेली अंधश्रद्धा, कुप्रथा दूर करायच्या असेल तर माणूस साक्षर होणे आवश्यक आहे या जाणीवेतून त्यांनी शिक्षणाचा प्रसार केला.

संत हे तत्त्वज्ञानी होते. समाजातील समस्यांची त्यांना जाणीव होती. लोकमनात असलेल्या कुप्रथा, अंधश्रद्धा बाहेर काढण्यासाठी त्यांनी लोकजीवनातील बोली, लोकजीवन यातील संदर्भ घेत आपले विचार व्यक्त केलेले दिसते. संतांनी लोकमानस ओळखले होते. त्यांच्या मनात असलेल्या कुप्रथांना त्यांच्यासत असलेले अज्ञान कारणीभूत असल्याचे लक्षात आल्यावर ज्ञानाचे माध्यम लोकभाषा असली व त्यांना लोकजीवनातील बाबींद्वारे ज्ञानाचे सुलभीकरण करणे महत्वाचे होते. म्हणूनच संतांनी लोकजीवनातील बाबी स्वीकारल्याचे दिसून येते. संतांनी केलेले प्रबोधन हे कालातीत आहे. आजही संतांच्या विचारांची, त्यांच्या मार्गदर्शक तत्त्वांची गरज समाजमानसास असलेली दिसते.

निष्कर्ष -

1. संत साहित्य हे परमेश्वर भक्तीकरिता जरी मुख्यत्वे निर्माण झाले तरी त्यातून सामान्य जनांचा उद्धार ही भूमिका
दिसून येते.

2. संतांनी लोकजीवनातील भाषा, जीवन यातील संदर्भ घेत लोकमनातील शंका निरसन केले असे म्हणता येईल.

3. संतांनी लोकांमध्ये रूढ असलेल्या प्रथा, परंपरातून आपले अध्यात्म विशद केले.

4. मनोरंजनातून शिक्षण ही भूमिका संतांनी स्वीकारलेली दिसते.

5. मानवी मनाचा सखोल विचार संतांनी करून आपले प्रबोधन मार्ग निवडले.

**संदर्भ -**

1. नसिराबादकर ल.रा., प्राचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर,आवृत्ती अकरावी 2016 पान 23

2. संपादक - भगत रा.तु., संतसाहित्य आणि समाजप्रबोधन, दिलीपराज प्रकाशन,पुणे, आवृत्ती पहिली 2005, पान 21

3. सरदार गं.बा., संत वाड्.मयाची सामाजिक फलश्रृती, लोकवाड्.मय गृह, मुंबई,आव्त्ती आठवी 2010 पान 90

4. देवस्थळी भालचंद्र, सार्थ मनाचे श्लोक, ढवळे प्रकाषन, आवृत्ती पाचवी 2004, पान 67

5. देशमुख उषा, संतकाव्यःसंचित, माया प्रकाषन, पहिली आवृत्ती 2000, पान 147

6. अभंगाचा गाथा, प्रकाशक श्री विठोबा - रखुमादेवी देवस्थान संस्थान, देहू आवृत्ती तिसरी, 2001, पान 462

7. ग्रामगीता, संपादक स्व. सुदाम सावरकर प्रकाशक - महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती महामंडळ, पुणे,पुनर्मद्रन 2011 पान202

**संत साहित्यातील प्रबोधन**

**प्रा. शशिकांत वि. काळे**